आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० एप्रिल २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या खटल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारतात प्रत्यार्पण
- बिहारमध्ये पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनात २२ लोकांचा मृत्यू
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते भारत - स्लोवाकिया व्यापार फोरमचं उद्घाटन
- भारत आणि ब्रिटनमध्ये ४०० दशलक्ष पौंडाचा करार

**आणि**

- ऋतुराज गायकवाडच्या दुखापतीमुळं चेन्नई सुपर किंग्जचं कर्णधारपद पुन्हा महेंद्रसिंग धोनीकडे

**<><><><><>**

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा याचं भारताकडे प्रत्यार्पण झाल्याचं राष्ट्रीय तपास संस्थेनं सांगितलं. त्याला नवी दिल्लीतल्या पटियाला न्यायालयात हजर केलं जाणार आहे. याठिकाणी NIA ची बाजू नरेंदर मान आणि दयान कृष्णन हे वकील मांडणार आहे.
२००९ पासून राणा अमेरिकेत अटकेत होता. राष्ट्रीय तपास संस्थेचं पथक राणाला घेऊन आज नवी दिल्लीत पोहोचलं. प्रत्यापर्णाच्या कारवाईला स्थगिती मिळावी यासाठी राणाने सर्व कायदेशीर मार्गांचा अवलंब केला होता. अमेरिकी न्याय व्यवस्थेनं प्रर्त्यापण रोखायला नकार दिल्यानंतर आज शेवटी त्याचं प्रत्यार्पण पूर्ण झालं.

**<><><><><>**

तहव्वुर राणाच्या प्रत्यापर्णाविषयी देशभरातून व्यक्त झालेल्या प्रतिक्रिया आता आपण ऐकूया…

**होल्ड...**

*राणा याचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या राजनैतिक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री अमित शहा आणि पीयूष गोयल यांनी दिली आहे. देशाकडे वाईट नजरेने पाहणाऱ्याला कठोर शिक्षा देण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा निर्धार होता, ज्याने भारताच्या भूमीवर हल्ला केला त्याला इथल्या कायद्यानुसार आपण शिक्षा करू शकतो असं गोयल म्हणाले.*

*तहव्वूर राणाला भारतात आणणं ही आनंदाची गोष्ट असून त्याला फाशीची शिक्षा दिली जावी, अशी अपेक्षा अशोक चक्र विजेते पोलीस कर्मचारी शहीद तुकाराम ओंबळे यांचे भाऊ एकनाथ ओंबळे यांनी व्यक्त केली. कायदेशीर प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी असंही ते म्हणाले.*

*तहव्वूर राणाचं प्रत्यार्पण हा भारतासाठी मोठा विजय असल्याचं शिवसेना नेत्या शायना एन सी म्हणाल्या. राणाला फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी त्यांनी केली.*

**<><><><><>**

तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणामुळे २६/११ मुंबई हल्ल्याचा पाकिस्तानशी असणारा संबंध उलडायला मदत होणार आहे. या हल्ल्याशी आपला संबंध नसल्याचं पाकिस्ताननं म्हटलं आहे. मात्र राणावरील खटल्यामुळे या कटाचा उलगडा होणार आहे. याप्रकरणाचा इतिहास थोडक्यात जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड**

*तहव्वूर राणा याला २६/११ मुंबई हल्ल्याप्रकरणी २००९ मधे अमेरिकेत अटक झाली होती. या हल्ल्यासाठी त्याने मदत पुरवल्याचं अमेरिकन न्यायालयात सिद्ध झालं आहे. या हल्ल्याचा मास्टरमाईंड डेव्हिड हेडली याला मदत केल्याचा त्याच्यावर ठपका आहे. राणाला २०१३ मधे १४ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. राणा आणि डेव्हिड हेडली यांच्याविरोधात मुंबई उच्च*

*न्यायालयात खटला चालवला गेला. तसंच त्याच्या प्रत्यार्पणाची मागणी भारताकडून केली जात होती. २०२३ मधे अमेरिकेने या प्रत्यार्पणाला मान्यता दिली होती. ही प्रक्रिया पूर्ण होऊन आज तहव्वूर राणा याचं प्रत्यार्पण भारताकडे झालं आहे.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईतसह मी राजेश शिरभाते*

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या प्रत्यार्पण कराराची माहिती जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड**

*१९६२ च्या प्रत्यार्पण कायद्यानुसार भारत आणि अमेरिका यांच्यात १९९७ ला प्रत्यार्पणाचा करार झाला होता. तत्कालीन प्रधानमंत्री इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारमधले परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री सलीम शेरवानी आणि अमेरिकेचे परराष्ट्र उपमंत्री स्ट्रोब टॅलबॉट यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. गुन्हेगाराला एक वर्षाची किंवा अधिकची शिक्षा झालेली असेल तर प्रत्यार्पणाचा कायदा लागू होतो. मात्र राजकीय गुन्ह्यांसाठी हा कायदा लागू होत नाही. या कायद्यान्वये एका देशाला हवा असलेला गुन्हेगार दुसऱ्या देशात असेल तर त्याला तिथेही फरार किंवा गुन्हेगार मानलं जातं. तसंच ज्या देशात त्याने गुन्हा केला आहे त्या देशात आणून इथल्या कायद्यानुसार खटला चालवला जाऊ शकतो. याआधी या कायद्यानुसार पंजाबचे मुख्यमंत्री प्रताप सिंग कैरो यांच्या हत्येतील आरोपी सुच्चा बस्सी आणि १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपी अबु सालेम यांचं प्रत्यार्पण भारताकडे झालं होतं.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईतसह मी अंकिता आपटे*

**<><><><><>**

बिहारमध्ये पावसामुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये आज २२ लोकांचा मृत्यू झाला. नालंदा, जेहानाबाद, मुझफ्फरपूर, आररिया आणि बेगुसराय जिल्ह्यात या घटना घडल्या. नालंदा जिल्ह्यात एका धार्मिक स्थळाची भिंत कोसळल्याने ९ जणांचा मृत्यू झाला आणि ५ जण जखमी झाले. नालंदा जिल्ह्यातच विविध घटनांमध्ये झाड कोसळून आणि भिंत कोसळून आणखी ९ जणांचा मृत्यू झाला. गेल्या २ दिवसात वीज कोसळून बिहारमध्ये ४२ जणांचा मृत्यू झाला आहे.

**<><><><><>**

स्लोवाक -भारत व्यापार फोरम उभय देशांत सहकार्य निर्माण करण्यासाठी आणि व्यावसायिक संधीचं परस्पर भागीदारीत रूपांतरित करण्याची एक उत्तम संधी आहे आणि भारतातील कुशल मनुष्यबळ स्लोवाकियन अर्थव्यवस्थेसाठी मौल्यवान ठरेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. आपल्या स्लोव्हाकिया दौऱ्या दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्लोवाक -भारत व्यापार फोरमचं आज उद्घाटन केलं, त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी स्लोवाकियाचे राष्ट्रपती पीटर पेलिग्रिनी आणि परराष्ट्र मंत्री जुराज ब्लानेर देखील उपस्थित होते.

भारत-स्लोवाकिया मैत्रीबाबत असलेल्या वचनबद्धतेबद्दल स्लोवाकियाच्या राष्ट्रपतींचे मुर्मू यांनी आपल्या भाषणात आभार मानले. भौगोलिक अंतर असले तरी दोन्ही देशांतील संबंध उत्तरोत्तर दृढ होत आहेत, असं प्रतिपादन स्लोवाकियाचे राष्ट्रपती पीटर पेलिग्रिनी यांनी आपल्या भाषणात केलं. स्लोव्हाकियाची अभियांत्रिकी क्षमता आणि भारताच्या आयटी आणि एआय क्षमता एकत्र आल्यास उत्तम यश मिळू शकते.

या दौऱ्यात आज सकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी रामायणावर आधारित कठपुतळी सादरीकरण पाहिलं.

**<><><><><>**

ब्रिटनच्या अर्थ खात्याच्या चान्सलर राचेल रीव्हस यांच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ४०० दशलक्ष पौंडाचा करार केला आहे. १३ व्या भारत - ब्रिटन आर्थिक आणि वित्तीय चर्चेदरम्यान लंडनमध्ये हा करार झाला.

जगातल्या बदलत्या व्यापार वातावरणाच्या पार्श्वभूमीवर भारत आणि ब्रिटन यांनी परस्पर सहकार्याची व्याप्ती वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये मुक्त व्यापार करार आणि द्विपक्षीय गुंतवणूक कराराचा समावेश आहे. सितारामन आणि रिव्हस यावेळी उपस्थित होत्या. दोन्ही देशांनी गेल्या काही वर्षात वाढलेल्या आर्थिक सहकार्याचे स्वागत केले असून दोन्ही देशाच्या प्रगतीसाठी पुढेही सहकार्य करण्यावर एकमत झालं आहे.

**<><><><><>**

ट्राय अर्थात भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने मोबाईल नेटवर्क सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना नेटवर्क कव्हरेजचे तपशील संबंधित कंपनीने ट्रायच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले होते. ट्रायच्या www.trai.gov.in या संकेतस्थळावर consumer info या विभागात मोबाइल कव्हरेज मॅप अंतर्गत हे नकाशे पाहता येतील. कुठल्याही ठिकाणी कोणत्या कंपनीचे किती नेटवर्क उपलब्ध आहे याची माहिती ग्राहकांना या नकाशाद्वारे मिळू शकेल.

**<><><><><>**

रविवारी होणाऱ्या बैसाखीच्या निमित्ताने पाच हजार ७०० यात्रेकरूंचा एक जथ्था आज अटारी-वाघा चेकपोस्टच्या मार्गाने पाकिस्तानला रवाना झाला. हे यात्रेकरू पाकिस्तानमधल्या विविध गुरुद्वाऱ्यांमध्ये दर्शनाला जाणार आहेत. यातले बहुतांश गुरुद्वारा हे शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक यांच्याशी संबंधित आहेत.

**<><><><><>**

आयात शुल्काच्या मुद्द्यावरुन अमेरिकेसोबत वाद नको असल्याची भूमिका चीननं घेतली आहे. पण चीनच्या नागरिकांच्या हक्कांचं उल्लंघन होत असताना त्याकडे त्रयस्थपणे पाहणं शक्य होणार नाही, असं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लियान जियान म्हणाले. चीन वगळता इतर देशांना आयात शुल्कातून ३ महिन्यांची सूट देण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतल्यानंतर चीननं ही प्रतिक्रिया दिली आहे. इतर देशांना सूट देताना चीनवर सव्वाशे टक्के आयात शुल्क ट्रम्प यांनी लादलं आहे.

**<><><><><>**

वेव्हज २०२५ अंतर्गत खादीच्या वापरासाठी नवकल्पना विकसित करण्यासाठी स्पर्धेच आयोजन करण्यात आलं होतं. मेक द वर्ल्ड वेअर खादी या स्पर्धेच्या अंतिम विजेत्यांची घोषणाही करण्यात आली आहे. हवास वर्ल्डवाइड इंडिया, २२ फूट ट्रायबल, Interactive Avenues, डीडीबी मुद्रा ग्रुप यांचा या विजेत्यांमध्ये समावेश आहे. यातल्या अंतिम विजेत्याची घोषणा येत्या १ ते ४ मे रोजी मुंबईत होणाऱ्या वेव्हजच्या अंतिम फेरीत होणार आहे.

**<><><><><>**

IPL क्रिकेट स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार ऋतुराज गायकवाड याला दुखापतीमुळे संघाबाहेर जावं लागल्याने कर्णधारपदाची धुरा महेंद्रसिंह धोनीकडे आली आहे. राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात ऋतुराजच्या उजव्या मनगटाला दुखापत झाल्याचं संघाचे प्रशिक्षक स्टिफन फ्लेमिंग यांनी सांगितलं. त्यामुळे धोनीकडे कर्णधारपद आलं आहे. २०२३ मधे गुजरात टायटन्सविरुद्धचा सामना धोनीचा कर्णधार म्हणून शेवटचा सामना होता.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरुनं शेवटचं वृत्त हाती आलं तोपर्यंत ९ षटकात ३ बाद ८९ धावा केल्या होत्या. बेंगळुरुत सुरू असलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><>//